# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १४७ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०१ श्रावण शके १९४८, गुरूवार दि.२३ जुलै २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# युवकांना समजून घेण्याची गरज!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

देशातील युवकांना समजून घेणे ही केवळ एक सामाजिक गरनसून देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक पाऊल आहे. आजचा युवक हा उद्याच्या देशाचा मुख्य आधारस्तंभ आहे.

देशाच्या प्रगतीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी युवकांना समजून घेणे आणि त्यांचे सबलीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. आजचा तरुण वर्ग हाच देशाचा खरा आधारस्तंभ आहे. युवकांच्या विकासासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलण्याची गरज आहे.

भारत हा जगातील सर्वात तरुण देश मानला जातो. जर या युवा शक्तीला योग्य वेळी समजून घेतले नाही, तर देशाचे मोठे नुकसान होऊ शकते.युवकांच्या कल्पना, त्यांचा उत्साह आणि कार्यक्षमता यांचा देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी उपयोग करून घेणे आवश्यक आहे.

शिक्षण आणि नोकरीच्या क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेमुळे तरुणांमध्ये नैराश्य  आणि चिंतेचे  प्रमाण वाढत आहे. त्यांच्या या मानसिक स्थितीला समजून घेऊन त्यांना आधार देणे गरजेचे आहे.पालकांच्या, समाजाच्या आणि स्वतःच्या वाढत्या अपेक्षांमुळे आजचे तरुण प्रचंड मानसिक दबावाखाली आहेत.

वाढती स्पर्धा आणि कौशल्यांचा अभाव यामुळे तरुणांमध्ये भविष्याबद्दल मोठी सोशल मीडियाचा प्रभाव, अपेक्षांचे ओझे आणि नैराश्य यामुळे तरुण पिढी मानसिक दबावाखाली आहे.त्याचबरोबर करिअर आणि वैयक्तिक आयुष्यात नेमकी कोणती निवड करावी, यासाठी योग्य समुपदेशन अनेकदा मिळत नाही.

आजच्या युवकांना फक्त ९ ते ५ ची नोकरी करण्यात रस नाही. त्यांना स्टार्टअप, कला, क्रीडा, आणि डिजिटल क्षेत्रात स्वतःचे करिअर करायचे आहे.त्यांच्यातील नाविन्यपूर्ण विचारांना समजून घेऊन, त्यांना आधुनिक कौशल्यांवर आधारित शिक्षण आणि रोजगाराच्या संधी देणे गरजेचे आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत आहे,मात्र या योजनांची म्हणावी तशी अंमलबजावणी होत नाही.युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना रोजगाराभिमुख करण्यासाठी भारत  सरकारद्वारे राष्ट्रीय युवा धोरण आखण्यात आले आहे.

कौशल्य विकास योजना,

स्टार्ट-अप इंडिया या सारख्या योजना सुरू आहेत,मात्र या योजनांची  अंमलबजावणी होत नसल्याने युवकांना अनेक आव्हानांना तोड द्यावे लागत आहे.

आजचा तरुण चौकटीबाहेरचा विचार करतो. त्याला चाकोरीबद्ध कामापेक्षा स्टार्टअप आणि नवनवीन प्रयोगांमध्ये रस आहे.तंत्रज्ञानाचा वापर करून जग बदलण्याची क्षमता आणि ऊर्जा आजच्या तरुणांकडे आहे. त्यांना जुन्या विचारांचे बंधन नको असते; त्यांना त्यांच्या विचारांचा आदर केलेला आवडतो.

अनेकदा घरात किंवा समाजात तरुणांचे विचार ऐकून न घेता त्यांच्यावर जुने विचार लादले जातात. यामुळे त्यांच्यात बंडखोरीची भावना निर्माण होऊ शकते.त्यांच्याशी मित्रासारखा मुक्त संवाद साधल्यास त्यांच्यातील ऊर्जा योग्य दिशेने वळवता येऊ शकते.

तरुण पिढी ही कोणत्याही देशाचे भविष्य असते. त्यांना केवळ दोष देण्याऐवजी त्यांच्या मानसिकतेचा आणि परिस्थितीचा सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. तरुणांच्या ऊर्जेला योग्य वाव मिळाल्यास देशात नवनवीन उद्योग आणि तंत्रज्ञान विकसित होईल.तरुण भरकटण्यापासून वाचले, तर गुन्हेगारी आणि व्यसनाधीनता कमी होऊन एक सुदृढ समाज घडेल.योग्य कौशल्ये आणि आत्मविश्वासाच्या जोरावर भारतीय युवक जागतिक पातळीवर  देशाचे नेतृत्व करू शकतात.

युवकांना फक्त उपदेश करण्यापेक्षा त्यांच्या पाठीवर विश्वासाचा हात ठेवणे गरजेचे आहे. त्यांची ऊर्जा ही देशाची सर्वात मोठी शक्ती आहे; गरज आहे ती फक्त तिला योग्य दिशा देण्याची.

युवकांना केवळ दिशाहीन किंवा चंचल म्हणून हिणवण्यापेक्षा, त्यांच्या समस्या, त्यांच्या आकांक्षा आणि त्यांची विचारपद्धती समजून घेणे काळाची गरज आहे. त्यांना योग्य दिशा दाखवली, तर ते देशाला एका नव्या उंचीवर नेऊ शकतात. आज समजून घेतलेला आणि योग्य दिशा मिळालेला युवक उद्याचा एक सुजाण, सुशिक्षित आणि जबाबदार नागरिक बनतो. थोडक्यात सांगायचे तर, युवकांना फक्त उपदेश देण्याऐवजी त्यांच्या जागी स्वतःला ठेवून त्यांच्या समस्या आणि विचार समजून घेणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

# १ ली ते १२ वीच्या सर्व शिक्षकांसाठी 'एआय  साथी फॉर एज्युकेटर्स' कोर्स अनिवार्य

ज्योतिर्मय 📖 साहित्य

पुणे - राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांनी दिक्षा  पोर्टल  वरील 'एआय साथी फॉर एज्युकेटर्स' (शिक्षकांसाठी एआय साथी) हा ऑनलाइन कोर्स पूर्ण करणे आवश्यक करण्यात आले आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र , पुणे यांनी कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या सहकार्याने हा ऑनलाइन कोर्स विकसित केला असून तो दिक्षा पोर्टल वर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कोर्सचे उद्घाटन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते १४ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे झाले.




कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा शिक्षण व प्रशासकीय कामकाजात प्रभावी वापर करण्यासाठी शिक्षकांना आवश्यक मूलभूत ज्ञान व कौशल्य मिळावे, हा या कोर्सचा मुख्य उद्देश आहे. अध्यापन नियोजन, शैक्षणिक साहित्य निर्मिती, मूल्यांकन, अहवाल लेखन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण यांसह विविध कामांमध्ये एआय  चा प्रभावी वापर करण्याबाबत या कोर्समध्ये मार्गदर्शन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार शिक्षकांसाठी आवश्यक असलेल्या सतत व्यावसायिक विकास प्रशिक्षणाच्या अनुषंगाने या कोर्ससाठी ८ तासांचे सीपीडी प्रशिक्षण श्रेय निश्चित करण्यात आले आहे.

या कोर्ससाठी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रवेश घेता येणार असून कोर्स पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२६ आहे. त्यामुळे राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांनी विहित मुदतीत कोर्स पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ संदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून महत्त्वाचे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक सुविधा, अध्यापनाचे नियोजन तसेच शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने संबंधित शाळा व शिक्षण विभागाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसह त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक आणि संबंधित यंत्रणांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीयश प्रतिष्ठानमध्ये भव्य रक्तदान शिबीर




ज्योतिर्मय 📖 साहित्य

छत्रपती संभाजीनगर दिनांक: २२/०७/२०२६  मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीयश प्रतिष्ठान यांच्या वतीने भव्य ''रक्तदान शिबिर '' या विशेष उपक्रमाचे आयोजन श्रीयश प्रतिष्ठान, सातारा, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे श्री. शिरीष बोराळकर, देवगिरी बँकेचे संचालक श्री. किशोर शितोळे तसेच ह्या कार्यक्रमास श्री. अरुण गुडदे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे भाजपाचे श्री. शिरीष बोराळकर आणि  श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे सर ह्यांच्या शुभ हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. श्री. किशोर शितोळे ह्यांनी दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केल्याबद्दल आणि मोठ्या संख्येने रक्त संकलन केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन  केले.  श्री. बसवराज मंगरूळे ह्यांनी सर्व रक्तदात्यांशी वैयक्तिक संवाद साधत रक्तदानाचे महत्व विशद केले. विद्यार्थ्यांचा रक्तदानातील सहभाग सामाजिक जाणीवेचे उदाहरण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सत्य साई लॅबचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी श्री. अरुण वाकडिकर यांनी रक्तदान व थॅलेसेमिया या विषयांवर माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. लायन्स ब्लड बँकेचे बाबासाहेब कळमकर, डॉ. प्रकाश पाटणी तसेच सत्य साई ब्लड बँक डॉ. महेंद्रसिंग चव्हाण यांच्या टीमने रक्तसंग्रहाचे कार्य यशस्वीपणे पार पाडले.

या रक्तदान यज्ञामध्ये श्रीयशचे अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, बीसीए, पॉलिटेक्निक आणि आयुर्वेद महाविद्यालयाचे एकूण ३१२ विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी रक्तदान केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठीश्रीयश प्रतिष्ठानचे मुख्याधिकारी कर्नल जॉय डॅनियल ह्यांचे मार्गदर्शन लाभले तसेच  डॉ. सचिन वानखेडे संचालक, श्रीयश व्यवस्थापनशास्त्र, प्रा. ब्रिजभूषण शुक्ला, प्रा. हर्षल चौथे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन  प्रा. अनिल पालवे यांनी केले.

या वेळी सर्व कॉलेजचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## नवोदित साहित्यिकांसाठी सुवर्णसंधी

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

Sanjay Vyapari

Scan to pay with any UPI app

ज्योतिर्मय साहित्य महाराष्ट्रातील सर्व नवोदित लेखकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. फक्त साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ई-दैनिक ज्योतिर्मय साहित्य हे आहे.
मागील दीड वर्षात या व्यासपीठावरून साधारण 150 + साहित्यिक तयार झाले आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.
नवोदित साहित्यिक या व्यासपीठावरून बिनधास्त लेखन करू शकतो कारण त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी टीम येथे आहे. याचा अनुभव मागील वर्षात अनेक साहित्यिकांनी घेतला आहे. त्यांचे साहित्य या व्यासपीठावरून त्यांचा फोटो व मोबाईल क्रमांकासह देण्यात येते. त्यामुळे वाचक त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो.
ज्योतिर्मय च्या व्यासपीठावरून कोणीही आपले विचार मांडू शकतो, त्यांच्यासाठी अट फक्त एकच आहे. त्यांना रुपये पाचशे भरून वार्षिक सदस्यता घ्यावी लागते, नंतर ते वर्षात संपूर्ण 365 दिवस या व्यासपीठाचा वापर करू शकतात.
मित्रांनो मग वाट कसली बघता लगेच ज्योतिर्मय साहित्य चे मेंबर व्हा व लिहिण्यास सुरुवात करा, तुमचे उज्वल भवितव्य लवकरच येथे घडणार आहे.

@ संजय व्यापारी,
संपादक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे
वार्षिक वर्गणी 7743918559 या नंबरवर किंवा दिलेल्या QR Code वर ऑनलाईन पाठवा. व पैसे भरल्याचा स्क्रिनशॉट पाठवा.


## आयएमए ची पंढरपूरची वारी उत्साहात संपन्न



ज्योतिर्मय 📖 साहित्य

छत्रपती संभाजीनगर : येथील आयएमए नी २० जुलै २६ रोजी प्रथमच आयोजित केलेली पंढरपूरची वारी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. वैद्यकीय क्षेत्रातील ही सर्व डॉक्टर मंडळी छत्रपती संभाजीनगर पंढरपूर क्षेत्री जवळपास २५ किलोमीटर चालत ही वारी त्यांनी मोठ्या आनंदाने उत्साहाने पूर्ण केली.

आयएमएचे अध्यक्ष डॉ.विकास देशमुख सचिव डॉ.प्रशांत दरख यांनी आयोजित केलेल्या आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारीमध्ये असंख्य डॉक्टर्स बरोबर वैद्यकीय अधिकारी विशेषतः महिला मंडळाच्या सदस्यांचा मोठा सहभाग होता.वयाच्या पंचाहत्तरीत असणाऱ्या डॉ.सूर्यकांत शिरपेवार यांनी पंढरपूरच्या वारीमधे मोठ्या उत्साहाने बऱ्याच गोष्टी सांगितल्या मार्गदर्शन केले ते साऱ्यांच्या स्मरणात राहून गेले.

संभाजीनगर मधील खूप मोठ्या पदावर असणारी ही डॉक्टर मंडळी सारं काही विसरून टाळ मृदंग वीणा वाद्यांच्या तालावर नाचत नाचत देहभान विसरून एका आत्मिक समाधानानी आनंदानी वारीमध्ये सहभागी झालेली होती.ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता मोठ्या उत्साहाने जवळपास २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी आलेली होती. अशा वारीचे प्रथमच आयोजित करण्यात आलेले होते.दुपारीनिघालेली या वारीची सांगता पालखीच्या दर्शनानंतर रात्री  १२ वाजता झाली.पंढरीत दाखल झालेल्या या डॉक्टर मंडळींनी पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना करीत मागणं मागितलं... आम्हां सर्वांच्या ह्दयात कायम सेवा भाव राहू दे..

तुझी माया आम्हां वरी सदैव राहू दे..तुझी वारी दरवर्षी घडू दे... असं मागणं मागत रात्री पालखीच्या दर्शनानंतर एम आय ए  या पायीवारीची सांगता झाली.

## सप्रेम भेट......



*मुंबई (ज्योतिर्मय साहित्य) : माहीम सार्वजनिक वाचनालय हे मुंबईतील एक सुप्रसिद्ध वाचनालय आहे. मी तेथे मेंबर आहे. या वाचनालयात सुमारे ८० हजार पुस्तके आहेत. माझ्या आत्तापर्यंत प्रकाशित झालेल्या प्रत्येक पुस्तकाची एक प्रत मी ह्या सार्वजनिक  वाचनालयाला सप्रेम भेट दिलेली आहे.*
*त्यानुसार आज मी "पुरुषस्य भाग्यम्" आणि "डेस्टिनी" ह्या आपल्या पुस्तकांची एक एक प्रत वाचनालयाला सप्रेम भेट दिली. माझ्याकडून पुस्तकाच्या प्रती स्वीकारत असलेले श्री संदीप पेडणेकर हे वाचनालयामधील ग्रंथपाल आहेत.*
*हे दोन्ही पुस्तकं ज्योतिर्मय प्रकाशन, पुणे यांनी नुकतेच प्रकाशित केले आहेत.*




## जात्यावरच्या ओव्या......

पंढरीचा पांडुरंग
माझा बाप माझी माय
तुझ्या विना रे विठ्ठला
मला जगी कुणी नाय ||७५४||

पंढरीचा पांडुरंग
माझा गरीबाचा
हवी तुळशीची माळ
नको हार सुवर्णाचा ||७५५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५४



### उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

तरुणपणीच भगवत भजनात रमलेला माणूस चुकूनही कल्पनेच्या राज्यात रममाण होत नाही. जी माणसे कल्पनेच्या राज्यात रमतात, ती कोणतेच कर्तव्य नीट पार पाडू शकत नाहीत. एकांताची सुद्धा सवय व्हावी लागते. एकांत पचावा लागतो. त्याची सवय व्हावी लागते. काही लोकांना समूहात राहण्याची एवढी सवय असते की ते एकांत सहन करू शकत नाहीत. पण सदैव लोकांमध्ये राहिले तर काही काळाने माणसाचे मन मलिन होते आणि मग अशा वेळी एकांत आणि स्व चिंतन आवश्यक असते.

म्हणूनच पूर्वीची माणसे काही काळ साधनेसाठी म्हणून घरातून निघून जात असत. आणि काही काळानंतर परत येत असत. दैनंदिन जीवनातील ताणतणाव, धावपळ इत्यादी गोष्टींना कंटाळलेली काही माणसे वर्षातून काही दिवस नियमितपणे विपश्यनेसाठी जातात त्याचाही उद्देश हाच असतो.



एखाद्याला भगवंत प्राप्तीची ओढ लागली तरी त्याचा उत्साह काही दिवस टिकतो आणि पुन्हा येरे माझ्या मागल्या सुरू होते. कारण लोकांमध्ये राहून त्याच्या मनात वेगवेगळे विचार येतात. तर कधी त्याचा बुद्धिभेद होतो आणि त्याचा जो निश्चय असतो तो ढळतो. माणसाचे मन अतिशय चंचल असते. बंधनात राहणे, एकच एक गोष्ट करणे त्याला आवडत नाही. म्हणून करुणाष्टकामध्ये समर्थ म्हणतात, '' घडी घडी बिघडे हा निश्चयो अंतरीचा, म्हणवुनी करुणा हे बोलतो दीनवाचा... '' परंतु परमेश्वराचा जो खरा भक्त असतो आणि तरुणपणापासूनच भगवंत प्राप्तीसाठी प्रयत्नशील असतो अशा व्यक्तीचा निश्चय कधीही ढळत नाही. अशी व्यक्ती म्हणजे परमेश्वराची खरोखरच प्रिय भक्त असते.

जीवनाचा पाया तरुणपणी घातला जातो

आणि ज्याने त्या काळात मनाला दिशा दिली,

त्याचा संपूर्ण जीवनप्रवास प्रकाशमान होतो.

स्वसंवाद :

१) मी साधना किंवा नामस्मरण ''नंतर करू'' असे म्हणून पुढे ढकलतो आहे का?

२) माझ्या दिवसात मला एकांतासाठी वेळ मिळतो का ? की मी तो जाणीवपूर्वक टाळतो?

३) मी वास्तवात कृती करतो का, की कल्पनांच्या जगातच रमतो?

४) माझा आध्यात्मिक निश्चय किती दृढ आहे? अडचणी आल्या की तो ढळतो का?

(क्रमशः)



## ॥ अभंग-माधव ॥

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

---------आषाढी एकादशी -----------

विठ्ठलाचे ध्यान। विटेवरी उभे।
अठ्ठावीस युगे। भक्तांसाठी ॥१॥
शोभून दिसती। कानीची कुंडले।
मन माझे डोले। आनंदाने ॥२॥
कर तर तुझे। आपुल्याच कटी।
चंदनाची उटी। भाळी शोभे ॥३॥
दिव्य तुझे चक्षु। स्मित हास्य ओठी।
उभा राहा पाठी। विठुराया ॥४॥
ह्या भव संसारी। दिसे तुज सर्व।
दुर्जनांचा गर्व। नष्ट कर ॥५॥
वारकरी सारे। चालुनिया आले।
पाहून निमाले। तव रूप ॥६॥
असू देत तुझी। सर्वांवरी कृपा।
विठू मायबापा। सदोदित ॥७॥
माधव हा म्हणे। आषाढीच्या दिनी।
ठेवा मनोमनी। भक्ती भाव ॥८॥

## ॥ संजय उवाच... ॥


@संजय काव्या पुणे 7743918559

✍ पाया

पाया म्हणजे आधार (पिलर) आणि आधार नेहमी भक्कम असला पाहिजे तरच घर टिकते जास्त मजबूत रहाते, मजबूत पायावरच उंच इमारती तयार होतात म्हणून उंची गाठण्यासाठी विश्वासाचा पाया मजबूत ठेवा.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## आपली सुखदुःखे श्रीरामाला सांगा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

तुम्ही सर्वजण छान सेवा करता आहात याबद्दल शंका नाही. अशीच सेवा अखंड चालू ठेवा, त्यातच कल्याण आहे. त्यानेच आपण तरून जाऊ. जरी कुणी काहीही सांगितले, ह्यात काय आहे, त्यात काय आहे, ह्याने काय होणार आहे, असे म्हटले, तरी तुम्ही तिकडे लक्ष देऊ नका. परमेश्वराची सेवा वाढवावी तेवढी थोडीच आहे. तो फार मोठा आहे, अमर्याद आहे, त्याला पहायला तशीच सेवाही फार मोठी करायला पाहिजे. त्याला पाहण्यासाठी तशी मोठी शक्तीही आपल्याला लागेल. अर्जुनाला श्रीकृष्ण परमात्म्याने दिव्य दृष्टी देऊन दर्शन घडविले. ती दिव्य दृष्टी आपल्याजवळ नाही, पण ती मिळविण्याची शक्ती आपल्याजवळ आहे. भक्तीची प्रगती ही खरी शक्ति; आणि त्याकरिता अखंड नामस्मरण हेच खरे साधन. श्रीरामप्रभू आपल्या घरातला कुणीतरी आहे याबद्दल खात्री बाळगा. त्याला तुम्ही आपली सुख-दुःखे सांगा. दिवसाकाठी एकदा तरी रामापुढे उभे राहून त्याला अनन्यभावाने शरण जा; दिवस आनंदात जाईल आणि तुमचे दुःख दूर होईल. आपले ज्ञान, शक्ति, वैभव, सत्ता, त्याच्यापुढे काहीच नाहीत. तेव्हा या सर्वांचा विसर पाडून, त्याला शरण जा, आणि त्याच्याजवळ प्रेम मागा. ''देवा ! आम्ही जे तुझे दर्शन घेतो ते सर्व बाह्य स्वरूपाचे; तुझे आम्हाला खरे दर्शन घडव. आम्ही अवगुणसंपन्न असू, तुझे दर्शन व्हावे एवढी सेवा आमच्याजवळ नाही, परंतु तू आता आम्हाला क्षमा कर. यापुढे देवा, कितीही संकटे येवोत, आमच्या प्रारब्धाचे भोग आम्ही तुझ्या नामात आनंदाने भोगू. जे काही व्हायचे असेल ते होऊ दे, आमचे समाधान टिकून तुझ्या नामात आमचे प्रेम राहील एवढी तुझी कृपा असू दे.''

खरोखर, परमेश्वर भक्ताचे मन पाहतो, त्याचा भाव पाहतो; एरव्ही तो त्याच्याजवळच असतो. जो श्रद्धेने परमेश्वराचे चिंतन करतो त्याला, परमेश्वर जवळ असून आपल्याला तो मदत करायला सिद्ध आहे याची खात्रीच असते. आपल्याला दोन मार्ग आहेत; एक श्रद्धेचा, आणि दुसरा अनुभवाचा. एका गावी पायवाटेने गेले तर फक्त तीन मैलांचे अंतर, आणि मोटारच्या रस्त्याने गेले तर दहाबारा मैलांचे अंतर. श्रद्धा ही त्या पायवाटेसारखी आहे. तिने चालले तर अंतर कमी पडेल. मोटारीचा मार्ग म्हणजे अनुभवाचा मार्ग. मोटार कुठे रस्त्यात बिघडली, किंवा वाटेत कुठे अडथळा आला, की प्रगती थांबते; त्याप्रमाणे अनुभवात काही चुकले की प्रगती खुंटते. तेव्हा शक्यतो आपण श्रद्धेचा मार्ग पत्करावा. सद्गुरूच्या शब्दावर विश्वास ठेवून श्रद्धेने आणि प्रेमाने नाम घ्यावे.

भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय.

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

### वारीतील आनंद

महाराष्ट्रात एक विलक्षण परंपरा आहे. जसजसा आषाढ महिना जवळ येऊ लागतो, तसतशी भक्तांना विठुरायाला पाहण्याची, त्याचे सुंदर रूपडे डोळ्यात साठवून ठेवण्याची, त्याच्या चरणाला स्पर्श करून, आपले गर्वाने उंचावलेले मस्तक त्याच्या चरणावर टेकवीण्याची विलक्षण घाई झालेली असते. या परमात्म्याला भेटण्यासाठी वाहनाने नव्हे, तर पायी, चिखल पाण्यातून, अंगावर ऊन वारा पाऊस घेत, पाई चालत भगवंताच्या नाम संकीर्तनात आनंदाने बेहोश होऊन, नाचत गात त्या पंढरी पर्यंत पोहोचण्याची घाई झालेली असते. वारीत जाणारे बहुतांश शेतकरी असतात. निसर्गाच्या लहरीवर त्यांचा चरितार्थ चालत असतो. कधी पाऊस पडतो, कधी नाही. त्यामुळे एक तर पेरणी होत नाही किंवा झाली तरी शेतात काही उगवत नाही. अशा परिस्थितीत आपला संसार सोडून, त्यातील व्यथा सोडून, विठ्ठलाचा नाम घोष करीत घरातून बाहेर पडायचे. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या कामाच्या दिवसात, त्या कामाला गौण स्थान देऊन विठुराया कडे धाव घ्यायची. आणि ही एक वेळ नव्हे तर दरवर्षी नियमबद्ध पद्धतीने त्याच वेळेस वारीला जायचे. जणू ही वारकऱ्यांची परीक्षा असते. चालण्याचे श्रम कोणाच्या लक्षातही येत नाहीत. चालून चालून दमले असले तरी, आनंदाने नाचत गात उत्साहात ही वारी पुढे सरकते. (क्रमश)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### नैराश्य टाळा /जीवन जगा

मित्रांनो आणि वाचकहो, दर दुसर्या दिवशी दैनिकातील बातम्या या मन सुन्न करतात. कुठे शेतकरी तर कुठे स्त्री पुरूष तर कुठे खूण, मारणे आत्महत्या,जीव देणे,कुठे व्यसन निराशा इत्यादी...

अशा नैराश्याच्या वेळी इतर पेक्षा स्वतःची साथ घेतली पाहिजे, मनाची साथ घ्या.

बघा पटतं का.. म्हणजे तुम्ही त्यावेळच्या भावना स्विकारा.. दुःख, एकटेपणा गोंधळ, आघात, कमी जास्त काम होणे न होणे (विद्यार्थी जसे पास नापास) सगळंच.. तेव्हा आतून शांतता मिळवली पाहिजे. मग बाहेरचं जग तसंच राहतं. मग असे टोकाचे निर्णय आपण घेत नाही. माणूस, स्त्री, तरूण मुले नैराश्यात जाणे म्हणजे दुःखाकडे खेचले जाणे होय. आजकाल या बातम्या हेच दर्शवतात. तेव्हा कोणत्याही घटनेने, चुकाने नकारात्मक होऊ नये. आयुष्यात चुका असे काही नसते, फक्त अनुभव असतात. कोणतेही अपयश खंत, निराशा असे काही नसते, ते फक्त प्रयत्न परिणाम असतात. म्हणून महिला काय किंवा कुणीही फक्त प्रगती पहावी. चुका करत शिकणे. विजेते, यशस्वी, प्रसिद्ध, पराभूत याच्या चौकटीप्रमाणे, व संकुचित निकषानुसार स्वतःची व्याख्या करू नका थांबा पहा पुढे चला. इतरांना खूश करण्यासाठी स्वतः तणावात जाणे योग्य आहे का? समाजाच्या चांगल्या व वाईटाच्या व्याख्येच्या पुढे जा तरच समाधानसुख काय ते समजेल!!म्हणून निराशा, अंधकारमय स्थिती किंवा रागाच्या भरात केलेली कृती टाळली पाहिजे. म्हणून जीवन संपून टाकणे कुणासाठीच हिताचे नाही.. आज एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग. स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.

## ॥ श्री दत्त महिमा ॥





लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड

### दत्त दिगंबर श्री अवधूत स्वामी दिगंबर श्री अवधूत

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या प्राचीन ग्रंथातील उल्लेखानुसार सप्तअरण्य, सप्तसरिता, सप्तसागर यांचा उल्लेख आढळतो जसे गंगा, सिंधू,सरस्वती,यमुना, गोदावरी, नर्मदा, कावेरी या सप्त सरिता आहेत तसेच सप्त अरण्य दंडकारण्य नैमिषारण्य, क्रौंचारण्य, मलयारण्य, उत्कल अरण्य, कुरुक्षेत्रअरण्य,

चित्रकुटअरण्य आदि यापैकी सर्वात प्राचीन आणि सर्वज्ञात असलेले असे दंडकारण्य आणि सर्वात प्राचीन नदी म्हणजे गौतमी अर्थात गोदावरी.

आपली कथा याच संदर्भात आहे त्रेतायुगातील प्रभू रामचंद्र आणि दंडकारण्य यांचा अतूट संबंध आणि सीतामाता प्रभू रामचंद्र आणि गोदावरी यांचाही घनिष्ठ संबंध आहे. कारण प्रभू रामचंद्र यांच्या १४ वर्षे वनवास काळातील सर्वाधिक म्हणजे बारा वर्षे काळ हा दंडकारण्य आणि गोदावरी परिसर यामध्ये व्यतित झाला अगदी नाशिक पंचवटी मधून सीता अपहरण सारखी घटना याच परिसरातील आहे आपणास असे वाटेल की दत्तमहात्म सांगताना हे काय नवीन?

भाविकांनो याचा संदर्भ अशासाठी की दत्त महाराज आणि प्रभू रामचंद्र यांचा महत्त्वाचा धागा जोडला जातो. कवी श्रीधर यांच्या रामायणातील एक प्रसंग ज्यामध्ये कवी श्रीधर लिहितात

''अत्रीचीया च्या आश्रमा प्रती येता झाला जनकजापती त्यांनी देखील कैवल्य मूर्ती नाश कल्पन्ति असेना ''

अर्थात अत्री अनुसया आश्रमात प्रभू रामचंद्र यांनी सीता माते सह लक्ष्मण यांनी दर्शन घेतले असा उल्लेख अनेक रामायणात आहे. ज्यावेळी अत्री अनुसया आश्रमात हे तिघेजण आले होते त्यावेळी सती अनुसया मातेने सीतामातेचे यथोचित स्वागत केले. आज जसे अनेक स्त्रिया एकमेकींच्या घरी गेल्यानंतर हळदी कुंकू साडी चोळी सौभाग्य अलंकार सह ओटी भरतात त्याप्रमाणे अनुसया मातेने सीता मातेला विधीवत स्वागत केले ज्येष्ठतेनुसार अनुसयेने त्यांना सांगितले की तू राजकन्या आहेस राजपत्नी आहेस आणि होणारी राजमाता आहेस अशा स्त्रियांनी एक वस्त्रा राहू नये म्हणून हे सुवर्ण अलंकार वस्त्र दिव्य जडीबुटी त्याचा स्वीकार करावा ज्याने तुझे सौंदर्य अबाधित राहील व हेच अलंकार पुढे अपहरणानंतर सीतामातेच्या मार्ग शोधना साठी हनुमंतराया ना सहाय्यभूत ठरले. हा प्रसंग घटना घडली ती दंडकारण्यात गोदावरी नदीच्या सानिध्यात व याच ठिकाणी आज राक्षसभुवन क्षेत्र वस्ती आहे दत्त महाराजांचा जन्म याच क्षेत्री झाला मार्कंडेय पुराण अग्निपुराण यातील उल्लेखानुसार प्रतिष्ठान नगरी म्हणजे आजचे पैठण या नगरीमध्ये कौशिक गोत्री ब्राह्मण राहत होता त्याच्या पत्नीचे जी आपल्या अनुसया मातेची सखी होती त्या कौशिक गोत्री ब्राह्मणाच्या पत्नीने आपले पतीचे प्राण वाचवण्यासाठी सूर्य देवास उदय होण्यापासून रोखले होते कारण मार्कंडेय ऋषींच्या शापामुळे सूर्योदयास तिचा पती मरण पावेल असा शाप मार्कंडेय ऋषींनी दिला होता मात्र सूर्योदय रोखल्यामुळे सर्व ब्रम्हांडातील रचना कोलमडू शकते म्हणून अनुसया मातेस मध्यस्थी करून आपल्या सखीला विनवणी करावी व सूर्योदय पुन्हा करावा अशी विनंती केली त्यावेळी ब्रह्मा विष्णू महेश या त्रिदेवांनी अनुसया मातेला केली त्या प्रसंगी मला अद्याप संतान प्राप्ती नाही तरी मला संतान प्राप्ती व्हावी अशी मागणी अनसुया माते ने केली त्यावेळी तुझी इच्छा पुर्ण होईल आम्ही तुझ्या पोटी पुत्र म्हणुन येऊ असा वर दिला तीच मुर्ती वरद दत्त. ही कथा म्हणजेच दत्त जन्माची कथा आहे दत्त म्हणजे देणे जसे निसर्गदत्त म्हणजे निसर्गाने दिलेले वाचादत्त म्हणजे वाचेने दिलेले ईश्वर दत्त म्हणजे ईश्वराने दिलेले म्हणून दत्त म्हणजे देणे हा सर्व प्रसंग घडला तेच स्थान म्हणजे आजचे आद्यपीठ वरद दत्त संस्थान या स्थानी भगवान दत्तात्रेयाची एकमुखी षडभुज मूर्ती वालुकश्मापासून बनलेली अशी ही मूर्ती खोलभुयार सदृश्य गर्भगृहां मध्ये विराजित आहे ते स्थान म्हणजे आद्यपीठ श्री वरदत्त संस्थान राक्षस भुवन तालुका गेवराई जिल्हा बीड या संस्थान ची कथा दत्तमहात्म ही माहिती आपण पुढील भागात घेणारच आहोत गुरुदेव दत्त कृपा करा.

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

#### मैफील गप्पांची

खूप दिवसांनी होता
बालपणीच्या मैत्रीणींची भेट
रंगते मैफील गप्पांची
सुंदर त्या आठवणींना
मिळतो पहा उजाळा
वर्षा होते आनंदाची

जेवनानंतर नेहमीच पहा
घरोघरी रंगत असते
सुंदर मैफील गप्पांची
एकत्रीत येता सर्वजण
आनंद होतो मनी
दृष्ट नको कोणाची

# पुणे ते बारामती राष्ट्रीय सायकल स्पर्धेचा मानकरी ठरला मणिपूरचा अथोकपाम बाईक सिंगे

## राष्ट्रीय घाटाचा राजा ठरला कर्नाटकचा श्रीनिवास राजपूत

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री, ऑलिम्पिक असोसिएशनचे माजी अध्यक्ष दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमीत्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडीया नवी दिल्ली आणि सायकल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने पुणे ते बारामती राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी देशभरातील राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील ४२५ स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण महाराष्ट्र राज्यविधानसभा उपाध्यक्ष मा. ना. आण्णा बनसोडे यांच्या हस्ते बारामती येथील गदिमा सभागृहात करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव ॲड. संदीप कदम यांनी केले.

आदरणीय अजितदादा पवार हे शेतकरी कष्टकरी फुले शाहू आंबेडकर यांचा पुरोगामी विचार पुढे घेऊन जाणारे नेतृत्व होते. दादा शेतकरी, कष्टकरी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे, स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी सतत झटत राहिले. त्यांच्या अडीअडचणीत रात्री अपरात्री उभे राहून अश्रू पुसायचे. जाती पातीचा कधीच विचार न करता वंचितांच्या मदतीने धावून जायचे. दादांनी केलेला विकास पिंपरी चिंचवड शहराकडे पाहिले की कळतो. माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याला त्यांनी मोठी संधी दिली. असे मत महाराष्ट्र राज्यविधानसभा उपाध्यक्ष मा. ना. आण्णा बनसोडे यांनी व्यक्त केले.

ही सायकल स्पर्धा आदरणीय अजितदादा पवार यांच्या प्रेरणेने सुरू झाली आहे. स्पर्धेचे हे दहावे वर्ष आहे. या स्पर्धा चार गटात घेण्यात आल्या देशभरातील



राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील ४२५ स्पर्धक सहभागी झाले. या स्पर्धेचे सूक्ष्म पातळीवर नियोजन करण्यात आले. स्पर्धे साठी आवश्यक असणाऱ्या सर्व तांत्रिक बाबी सायकल असोसिएशनच्या पदाधिकारी यांनी सांभाळल्या. त्यामुळे ही स्पर्धा यशस्वी झाली. ही स्पर्धा अनेक युवकांना प्रेरणादायी ठरत आहे. असे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव ॲड. संदीप कदम यांनी प्रास्ताविकात सांगितले.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे (कंसात कि.मी. व वेळ)

घाटाचा राजा (दिवे घाट) – राष्ट्रीय स्पर्धा– कर्नाटकचा श्रीनिवास राजपूत (८. मी. ३२ सेकंद )

घाटाचा राजा (दिवे घाट) – राज्य स्पर्धा – महाराष्ट्राचा निहाल नदाफ ( ८ मी. ४०सेकंद )

१) पुणे ते बारामती पुरुषांसाठी राष्ट्रीय स्तर (१२२ कि.मी.), प्रथम क्रमांक – मणिपूरचा अथोकपाम बाईक सिंगे (२.२९.००), द्वितीय क्रमांक – तामिळनाडूचा जोएल सुंदराम (२.२९.३७), तृतीय क्रमांक – गुजरातचा ध्रुव दिया (२.३०.३०) याने पटकावला.

२) पुणे ते बारामती पुरुषांसाठी राज्यस्तर – (१२२ कि.मी.)

प्रथम क्रमांक – महाराष्ट्राचा अमन तांबोळी (२.३७.३३), द्वितीय क्रमांक –महाराष्ट्राचा हनुमान चोपडे (२.३८.२७), तृतीय क्रमांक – महाराष्ट्राचा रेहान शेख (२.३९.४८) याने पटकावला ३) सासवड ते बारामती सायकल खुली स्पर्धा पुरुषांसाठी राज्यस्तर (८५ कि.मी.)

प्रथम क्रमांक – महाराष्ट्राचा ओंकार खेडकर (२.४१.०९), द्वितीय क्रमांक – महाराष्ट्राचा स्वराज कराळे (२.४१.१२), तृतीय क्रमांक –महाराष्ट्राचा वेदांत टिळेकर (२.४१.१५) याने मिळवला. ४) माळेगाव ते बारामती महिलांसाठी राष्ट्रीयस्तर (१५ कि.मी.)

प्रथम क्रमांक – कर्नाटकच्या गंगा दांडीन ( २२. ११. ०८२ मिनिटात), द्वितीय क्रमांक– महाराष्ट्राच्या योगेश्वरी कदम(२२.१२.८१५ मिनिटात ), तृतीय क्रमांक –महाराष्ट्राच्या राजनंदिनी सोमवंशी (२२.१२.९२० मिनिटात) यांनी पटकावला.

सासवड – बारामती सायक्लोथॉन (८५ कि. मी.)

प्रथम क्रमांक – महाराष्ट्राचा अनुप पवार (२.१५.५४), द्वितीय क्रमांक– महाराष्ट्राचा अक्रम देवकाते (२.१६.०४), तृतीय क्रमांक – महाराष्ट्राचा खदुस शेख (२.१८.२७)याने पटकावला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला माळसकांत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी योगासनांचे सादरीकरण केले.

या प्रसंगी पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष मा. विरधवल जगदाळे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मनोहर चासकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र–कुलगुरू मा. डॉ. पराग काळकर, बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव, उपाध्यक्षा श्वेता नाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुणे जिल्हा अध्यक्ष मा. संभाजी होळकर, बारामती तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन मा. रमेश जगताप, माळेगाव सह. साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन मा. संगीता कोकरे, मालेगाव नगर पंचायत नगराध्यक्ष मा. सुयोग सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेसपक्ष बारामती तालुका अध्यक्ष संदीप बांदल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बारामती शहर अध्यक्ष ॲड. किरण इंगळे, प्रवीण पाटील, प्राचार्य देविदास वायदंडे, जेष्ठ नेते विश्वास देवकाते, आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हडपसर विधानसभा अध्यक्ष डॉ. शंतनू जगदाळे, आजीव सदस्य अशोक खळदकर, विद्या प्रतिष्ठानचे प्राचार्य भरत शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल.एम. पवार, सहसचिव ए. एम जाधव तसेच सायकल असोसिएशनचे सचिव संजय साठे , दिपाली पाटील, श्रीनाथ थोरात, सुदाम रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सायकल स्पर्धा यशस्वी होण्यासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सर्व शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या स्पर्धेस विद्या प्रतिष्ठान बारामती व एन्व्हॉयर्मेंटल फोरम ऑफ इंडिया या संस्थांचे सहकार्य लाभले.

सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड व प्रा. संध्याराणी आटोळे यांनी केले तर आभार प्रदर्शन नगराध्यक्ष सचिन सातव यांनी केले.

# प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांना ‘शैक्षणिक दूरदर्शी पुरस्कार २०२६’

**ज्योतिर्मय साहित्य**



पुणे – हडपसर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांना पुणे येथे आयोजित विशेष समारंभात भारत सरकारच्या राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एन.एस.डी.सी.), राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण परिषद (एन.सी.व्ही.ई.टी.) आणि कौशल्य भारत, प्लस नाईन वन मीडियाचे यांच्या संयुक्त विद्यमाने एज्युकेशनल कॉन्क्लेव २०२६ या विशेष कार्यक्रमात ‘शैक्षणिक दूरदर्शी पुरस्कार २०२६’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवणाऱ्या व्यक्तींचा गौरव या पुरस्काराने करण्यात आला. डीटूएलचे व्यवस्थापकीय संचालक – भारत विवेक अय्यर, पुणे विभाग तंत्रशिक्षण संचालनालय सहसंचालक डॉ. सुरेश ए. पाटील, कमलाबाई एज्युकेशनल अँड चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. पवन अग्रवाल, रामदेवबाबा विद्यापीठाचे डॉ. एस. एस. मानथा माजी अध्यक्ष – एआयसीटीई आणि कुलपती डॉ. एस. एस. मानथा, वाराणसी, नाशिक, ऑपिस वा नागपूर – लावा लर्नर आणि डायरेक्टर सिद्धार्थ राजगरिया यांच्या उपस्थित हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्राचार्य घोरपडे यांनी उच्च शिक्षणात राबवलेल्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, समाजाभिमुख कार्य आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून उच्च शिक्षणात राबवलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे हा मनाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्राचार्य घोरपडे यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध समित्यांवर त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित झाले असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंधांचे सादरीकरण केले आहे. तसेच त्यांच्या नावावर पेटेंट देखील आहेत. नुकतेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली अण्णासाहेब मगर महाविद्यालयाला नॅककडून अ पल्स दर्जा, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ‘उत्कृष्ट महाविद्यालय’ पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ‘जगन्नाथ राठी उत्कृष्ट महाविद्यालय’ पुरस्कार, पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत हीरक महोत्सवी करंडकसह एकूण सहा पारितोषिके, पुरुषोत्तम करंडक राज्यस्तरीय महाअंतिम फेरी तृतीय क्रमांकासह अभिनयासाठी दोन बक्षिसे, महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा पुणे केंद्रात प्रथम क्रमांक मिळवत एक लाख रुपयांचे बक्षीस मिळविले व पुढे राज्य स्तरावर सहभाग मिळवला. मतदान जागृती उपक्रमासाठी राज्यस्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, क्विक हील फाउंडेशन राज्यस्तरावर न्यू क्लब रनर–अप (न्यू क्लब रनर – अप) पुरस्काराने सन्मानित, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र करिअर कट्टा करिअर कट्टाचे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

किर्लोस्कर फाऊंडेशनचा वसुंधरा स्मार्ट कॉलेज–ग्रीन कॅम्पस पुरस्कार पुरस्कार देऊन महाविद्यालयास गौरविले आहे.

या यशाबद्दल प्राचार्य घोरपडे यांचे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा व महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव (प्रशासन) ए. एम. जाधव, महाविद्यालयातील सर्व अध्यापक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – दिनांक २१ जुलै २०२६ रोजी, मा. देवा भाऊ यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा अध्यक्ष मा किशोर दादा शितोळे यांच्या मार्गदर्शनातून महिला मोर्चा अध्यक्ष डॉ. उज्वला दहिफळे (प्लास्टिक सर्जन) यांच्या वतीने आय एम ए हॉल येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन शहराध्यक्ष श्री. किशोर दादा शितोळे यांच्या हस्ते पार पडले. वाढदिवसाच्या संख्येप्रमाणे ५६ बॅग रक्ताचे संकलन करण्यात आले.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस श्री हर्षवर्धन कराड छाया खाजेकर बबन नरवडे महेश मल्लेकर,निलेश धारकर राहुल लोखंडे , डॉ. मांगेश तांदळे, डॉ. सचिन जंगले, डॉ. सायली समुद्रे, डॉ. प्रफुल्ल जटाळे,डॉक्टर वैष्णवी घुगे,नगरसेविका सौ कीर्ती शिंदे सौ सीमा साळवे, सौ अमृता पालोदकर, महिला मोर्चा सरचिटणीस सौ सुनीता औरदे,सौ कविता देशमुख,सौ वंदना शहा,विजया




भोसले आशा जाधव,संदीप साळवे भारती राजपूत, संजय मंत्री, रोहिणी खरे,रुपाली सुतार तसेच आयएमएचे पदाधिकारी उपस्थित होते.

एका रक्ताच्या बॅगेमुळे तीन रुग्णांना जीवनदान मिळू शकते. शरीरात नवीन रक्त पूर्णपणे पुनर्भरण होण्यासाठी साधारणतः तीन महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे रक्तदान हे सर्वोत्तम सामाजिक दान मानले जाते. सर्व उपस्थितांच्या सहभागामुळे रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रक्तसंकलनासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि लायन्स क्लब यांनी मोलाचे सहकार्य केले.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**



# प्रत्येक घरात एक छोटी पंढरी

**अमोल बोरीकर 86240 03013**

आषाढी वारी संपते. वारकरी घरी परततो. गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर बुक्का, हातात प्रसाद... पण खरा प्रश्न तेव्हा सुरू होतो– विठ्ठल पंढरपूरातच राहिला... की आपण त्याला आपल्या घरात घेऊन आलो?

जर विठ्ठल मंदिरातच राहिला, तर वारी अपुरी राहिली. पण जर तो आपल्या घरात, आपल्या वागण्यात, आपल्या संस्कारांत उतरला... तर प्रत्येक घर एक छोटी पंढरी बनू शकतं.

घर पंढरी बनणे म्हणजे काय? तर घरातील प्रत्येकाने एकमेकांच्या चुका पोटात घालणे, संकटाच्या वेळी परस्परांचा आधार बनणे आणि स्वार्थाचा त्याग करून सेवेची भावना ठेवणे. वारीमध्ये जसा श्रीमंत-गरीब, लहान-मोठा असा कोणताही भेदभाव नसतो आणि प्रत्येक जण दुसऱ्याला 'माऊली' म्हणून नमस्कार करतो; तसाच भाव जर आपल्या कुटुंबात निर्माण झाला, तर घराचे रूपांतर मंदिरात व्हायला वेळ लागत नाही.

घरातल्या या छोट्या पंढरीत दररोज भक्तीचा, संस्कारांचा आणि प्रेमाचा गजर झाला पाहिजे. संध्याकाळी एकत्र बसून मनाला शांती देणारे भजन, मुलांवर केले जाणारे आदरयुक्त संस्कार आणि घरातील वृद्धांची आस्थेने केली जाणारी काळजी – हीच या पंढरीची खरी पूजा आहे. जेव्हा घरातला प्रत्येक माणूस दुसऱ्याच्या सुखात सुख आणि दुःखात सहभाग शोधू लागतो, तेव्हा दारातली तुळस अधिक टवटवीत हसू लागते आणि साक्षात पांडुरंग त्या घरात वास करतो.

"पुंडलिके काय केले। मातापिता सांभाळिले।
म्हणूनिया आले। पंढरीसी विठ्ठल।।"

भक्त पुंडलिकाने आई-वडिलांची सेवा सोडली नाही म्हणूनच साक्षात परब्रह्म त्याच्या दारी वीट धरून उभे ठाकले. संत तुकाराम यांनी रंजल्या-गांजल्यांत देव पाहिला. ज्ञानेश्वर यांनी संपूर्ण विश्वालाच कुटुंब मानलं. हीच शिकवण जर आपल्या घरात आली, तर विठ्ठलाला पंढरपूरात शोधण्याची गरज उरणार नाही.

रोज संध्याकाळी पाच मिनिटे एकत्र नामस्मरण...
आठवड्यातून एकदा एकत्र जेवण...
आई-वडिलांसोबत मनमोकळा संवाद...
एखाद्या गरजवंताला मदतीचा हात... आणि घरात कायम प्रेमाची भाषा... इतकंच पुरेसं आहे.

यंदा वारीतून परतताना फक्त तुळशीची माळ, बुक्का आणि प्रसाद घेऊन येऊ नका... विठ्ठलाचा स्वभाव घेऊन या. कारण ज्या दिवशी प्रत्येक घरात रागाऐवजी प्रेम, स्वार्थाऐवजी सेवा, कटुतेऐवजी संवाद आणि अहंकाराऐवजी "माऊली" ही हाक उमटेल... त्या दिवशी पंढरपूर एका गावात राहणार नाही; ते प्रत्येक घरात जन्म घेईल. त्या दिवशी संपूर्ण समाज विठ्ठलमय होईल.

॥ रामकृष्ण हरी ॥

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

**© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495**





रामराज्य (भाग २)

भरताने चालवलेला हा राज्यकारभार स्वतःच्या मनाने घेतलेला निर्णय नव्हता, तर तो श्रीरामांच्या आज्ञेचे आणि वचनाचे तंतोतंत पालन होता. या मागचा घटनाक्रम आणि त्याचे महत्त्व खालील मुद्द्यांवरून स्पष्ट होते:

१. रामांच्या आज्ञेचे पालन (अधिष्ठान)

चित्रकुटावर जेव्हा भरत रामांना परत येण्यासाठी विनवणी करत होते, तेव्हा रामांनी त्यांना पितृवचनाचे पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले. रामांनी स्पष्ट आज्ञा केली की, "मी वनवास पूर्ण करेन आणि तू अयोध्येचे पालन कर." भरताने ही आज्ञा शिरसावंद्य मानली. पादुका सिंहासनावर ठेवण्याचा अर्थच हा होता की, 'राजे श्रीरामच आहेत, राजाची आज्ञा हीच अंतिम आहे आणि मी केवळ त्या आज्ञेची अंमलबजावणी करणारा सेवक आहे.' चौदा वर्षे भरत प्रत्येक लहान-मोठा निर्णय घेण्यापूर्वी पादुकांना नमस्कार करून, जणू रामांची अनुमती घेऊनच कारभार पाहत असत.

२. मुदतीची अचूकता (भरताची प्रतिज्ञा)

भरताने रामांकडून एक कठोर वचन घेतले होते की, चौदा वर्षांचा वनवास संपताच, पुढच्याच दिवशी रामांनी अयोध्येत पाऊल ठेवले पाहिजे. वाल्मीकि रामायणात भरताची प्रतिज्ञा अशी आहे:

चतुर्दशे हि संपूर्णे वर्षे ह्यहनि पञ्चमे।
न द्रक्ष्यामि यदि त्वां तु प्रवेक्ष्यामि हुताशनम्॥
(वाल्मीकि रामायण, अयोध्याकाण्ड, ११२.२९)

"चौदा वर्षे पूर्ण झाल्यानंतर (१५ व्या वर्षाच्या) पहिल्याच दिवशी जर मला आपले दर्शन झाले नाही, तर मी अग्नी प्रवेश करून माझे प्राण अर्पण करेन."

( क्रमशः )



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

**विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२**

## 'आजोबा' (सुरकुत्यांमधील शहाणपण)

पुढे.......

त्यांचं हे मोठेपण व्यक्त करणारे 'पितामह' आणि 'मातामह' हे अतिशय सार्थ व वजनदार शब्द आपल्या संस्कृतीत आहेत. वडिलांपेक्षाही ज्यांचं स्थान वरचं आहे, अशी आदरणीय व्यक्ती म्हणजे पितामह! आईचे वडील आणि वडिलांचे वडील म्हणजेच आपले आजोबा. महाभारत काळात भीष्मांना 'पितामह' म्हणून ओळखलं जायचं आणि त्यांचा केवढा आदर त्या काळातली सगळी मंडळी करायची, हे आपण जाणतोच.

आजी-आजोबांचे छत्र आणि त्यांची निर्मळ, अपार माया ज्यांना लहानपणी लाभली, ती मुलं खरोखरच खूप भाग्यवान!

आई-वडिलांपेक्षा देखील संस्कारांचं खरंखुरं बाळकडू आजी-आजोबांकडून नातवंडांना मोठ्या प्रमाणात मिळतं आणि त्यामुळेच त्यांचं व्यक्तिमत्त्व नकळत समृद्ध होत जातं. आजोबांच्या चेहऱ्याकडे कधी आपण निरखून पाहिलं आहे का? त्यांच्या चेहऱ्यावरच्या आणि हातावरच्या प्रत्येक सुरकुतीत आयुष्यातील संघर्षाचा, कष्टाचा आणि यशाचा एक मोठा इतिहास दडलेला असतो. त्यांनी अनुभवलेलं जग, पाहिलेले ऋतूंचे बदल आणि आयुष्यात आलेले चढ-उतार हे संपूर्ण कुटुंबासाठी एखाद्या मार्गदर्शक दीपस्तंभासारखे असतात. जेव्हा संपूर्ण कुटुंब किंवा प्रपंच एखाद्या वैचारिक वादळात सापडतो, काय निर्णय घ्यावा हे सुचत नाही, अशा वेळी आजोबांचा एक शांत, धीरगंभीर शब्दही सगळ्या वादळाला शांत करतो आणि घरातील प्रत्येकाला जगण्याचं बळ देऊन जातो. (क्रमशः)

# कर्मयोग : दशमेशापलीकडील यशाचे तत्त्वज्ञान

## श्रीराम, श्रीकृष्ण आणि कर्मयोग (भाग २)

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रभू श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या जन्मकुंडल्या भारतीय ज्योतिषशास्त्रात अत्यंत विलक्षण मानल्या जातात. त्या केवळ ग्रहयोगांच्या दृष्टीनेच नव्हे, तर त्यांच्या जीवनातून प्रकट झालेल्या कर्मयोगाच्या तत्त्वामुळेही अभ्यासकांना आकर्षित करतात. वाल्मीकि रामायणातील बालकांडात प्रभू श्रीरामाच्या जन्मवेळच्या ग्रहांची स्थिती खालील प्रमाणे वर्णन केलेली आहे.


**ततो यज्ञे समाप्ते तु ऋतूनां षट् समत्ययुः ।**
**ततश्च द्वादशे मासे चैत्रे नावमिके तिथौ ।। ८।।**
**नक्षत्रेऽदितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पञ्चसु ।**
**ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पताविन्दुना सह ।। ९।।**
**प्रोद्यमाने जगन्नाथं सर्वलोकनमस्कृतम् ।**
**कौसल्याजनयद् रामं दिव्यलक्षणसंयुतम् ।। १०।।**

।। श्रीरामाची जन्मकुंडली ।।
।। शुभं भवतु ।। ( स्त्रोत: वाल्मिकी रामायण )

त्यानंतर यज्ञ संपल्यावर सहा ऋतू (बारा महिने) निघून गेले. यज्ञ संपल्यानंतरच्या बाराव्या महिन्यात, चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला, पुनर्वसु नक्षत्र (ज्याची अधिष्ठात्री देवता अदिती आहे) लग्नात असताना आणि पाच ग्रह (सूर्य, मंगळ, शनी, गुरू आणि शुक्र) आपापल्या उच्च राशींमध्ये (अनुक्रमे मेष, मकर, तूळ आणि कर्क) असताना, तसेच गुरू चंद्रासह कर्क राशीत असताना. जगाचा स्वामी, सर्व लोकांना वंदनीय असा दिव्य लक्षणांनी युक्त पुत्र कौसल्येने जन्माला घातला, ज्याचे नाव राम होते.

।। श्रीकृष्णाची जन्मकुंडली ।।
।। शुभं भवतु ।। ( स्त्रोत: इंटरनेट अर्काइव्हज् )

भगवान श्रीकृष्णांच्या कुंडलीतही याच प्रकारची सामर्थ्यशाली ग्रहस्थिती आढळते. कुंडलीतील अनेक ग्रह त्यांच्या त्यांच्या उच्चस्थानी असून कर्मस्थानाचा अधिपती बलवान आहे. राजकारण, प्रशासन, दूरदृष्टी, पराक्रम आणि लोकनेतृत्व यांना पोषक असे अनेक शुभयोग त्यात आढळतात.



प्रभु श्रीरामाची जन्मकुंडली श्रीकृष्णाची जन्मकुंडली

या पार्श्वभूमीवर एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो कि, जर दोघांच्याही कुंडल्यांमध्ये इतके बलवान ग्रह आणि समर्थ दशमेश आहे, तर त्यांना जीवनात संघर्ष, दुःख आणि कठोर कर्तव्यपालन का करावे लागले?

प्रभू श्रीरामांना चौदा वर्षांचा वनवास भोगावा लागला; पत्नीचे अपहरण, रावणाशी युद्ध आणि अनेक संकटांचा सामना करावा लागला. भगवान श्रीकृष्णांनाही जन्मापासूनच संकटांनी वेढले होते. कंसाचा अत्याचार, मथुरेचा त्याग, महाभारतासारख्या धर्मयुद्धाची जबाबदारी आणि संपूर्ण आयुष्यभर धर्मसंस्थापनेसाठी केलेले अथक प्रयत्न, हे सर्व त्यांच्या जीवनातील वास्तव होते.




यावरून एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट होते की, बलवान दशमेश हा कर्माचा पर्याय नाही. तो कर्म करण्याची क्षमता, संधी आणि अनुकूलता देऊ शकतो; परंतु कर्म करण्याची जबाबदारी मात्र व्यक्तीची स्वतःचीच असते. याच कारणामुळे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला भगवद्गीतेचा उपदेश केला. संपूर्ण अठरा अध्यायांचा हा ग्रंथ एका मूलभूत तत्त्वाभोवती फिरतो, कर्माशिवाय जीवनाला पर्याय नाही.

भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात.

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।। (३.२२)

हे पार्थ! या तिन्ही लोकांत माझ्यासाठी कोणतेही कर्तव्य शिल्लक नाही. मला प्राप्त करावयाचे काहीही उरलेले नाही; तरीसुद्धा मी अखंड कर्म करीत असतो. या श्लोकात कर्मयोगाचे सार दडलेले आहे. जेथे स्वतः परमेश्वरही कर्म करीत राहतो, तेथे सामान्य माणसाने कर्मापासून दूर राहण्याचा विचार करणे अयोग्य ठरते.

यावरून स्पष्ट होते की, जन्मकुंडलीतील दशमस्थान अथवा दशमेश कितीही बलवान असला, तरी विहित कर्म करण्यापासून कोणाचीही सुटका होत नाही. काही लोक असा समज करून घेतात की, ''माझ्या कुंडलीत कर्मस्थान आणि त्याचा अधिपती बलवान आहे; त्यामुळे मला विशेष प्रयत्न करण्याची गरज नाही. सर्व काही आपोआप घडून येईल.'' हा समज अत्यंत धोकादायक आहे. कारण अशा प्रकारचा विचार व्यक्तीला पुरुषार्थापासून दूर नेतो.

प्रत्यक्षात व्यक्तीचे जीवन केवळ दशमस्थानावर अवलंबून नसते. प्रथम भाव, नवम भाव, त्यांच्यावर पडणाऱ्या शुभ-अशुभ ग्रहांच्या दृष्टी, बुद्धी, विवेक, मानसिक स्थैर्य, निर्णयक्षमता आणि इतर अनेक ग्रहयोग यांचा एकत्रित परिणाम व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर होत असतो.

**(भाग -३ : व्यक्तिमत्त्व, कार्यप्रवणता आणि दशमस्थान)**

# १ रु. देणगी टाका, देव तुमचा होईल...

**ज्योतिर्मय साहित्य**

देव भावाचा भुकेला!! हे आपण सगळ्यांनी ऐकलं आहे. पण आज देवाच्या ठिकाणी भरपूर थैल्या रिकाम्या केल्या जातात. आमच्या विठ्ठलाला गरीबांचा देव म्हणतात. पण अधिक महिन्यात साडेनवू कोटीच दान मंदिरात आलं. अरं बाबांनो सगळ्या संतांनी सांगितलं देवाला प्राप्त करून घेण्यासाठी पैसा द्यावा लागत नाही. पैशाने देव विकत घेता येत नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव!अशानं देव पाठवायचा नाही हो! देव बाजारचा भाजीपाला नाही हो!! दस्तुरखुद्द देवांनीही सांगितले आहे भगवतगीते मध्ये पत्रं पुष्पं फलं तोयं!नमे भक्त्यां प्रयच्छती... एवढं स्वतः देवांनी सांगितलेलं तरी ऐकावं ना. पण तसं कसं... खिशात पैसा आलाय म्हणल्या वर मंदिरात रिकामा करायची खाज सुटते की काय? कुणी दर्शनासाठी पैसा देतो.कुणी सोन्याचे दागिने देतो. अरे दर्शन दिल्या बद्दल देवाला लाच देतात काय? गोरगरीब लोकांना गरजेच्या वस्तू द्याव्यात,ज्यांना अन्नदानाची गरज आहे त्यांना ते द्यावे.







देव खात नाही,देव खर्च करीत नाही. मग हुंड्यात पैसा कशाला ओतता?

देव काय गरीब आहे? एकदा एक विनोद नोटबंदी नंतर पहायला मिळाला होता. एक व्हिडिओ होता तो. एक व्यक्ती पाचशे ची नोट पावती फाडून झाल्यावर तिथल्या माणसाच्या हातात देतो. तो म्हणतो जुनी नोट आहे, हा म्हणतो ते दोघांना माहिती आहे, देवाला कुठं माहिती आहे? अरे मुर्ख देवाला थोडीच लागतंय? वगैरे संवाद त्यात होता. जर देवाला पैसा लागत नाही तर मग आपण का मोठं मोठ्या रकमा पेटीत ओतायच्या? विविध ठिकाणच्या मंदिरातून मोठं मोठ्या रकमांची चोरी झाली अशा बातम्या आपण ऐकत आहोत. ते खरं की खोटं देव जाणो!! तुकाराम महाराजांनी तर कित्येक अभंगातून देव केवळ भाव भक्ती पहातो असेच महाराज म्हणतात.

देव उचनिच, गरीब श्रीमंत हा भेद करीत नाही. उचनिच काही नेते भगवंत! तिष्ठे भाव भक्ती देखोनिया!! निदान देव म्हणतोय, तुकोबा, तुकडोजी, गाडगेबाबा यांच्या सारखे संतांचे तरी ऐका!! किती प्रमाण, किती संदर्भ, किती दृष्टांत, किती उदाहरणे आहेत. थोडं तरी बघा. आपलं दान कुठं पर्यंत झिरपत जातेय हे माहीत तरी आहे का?

मंदिरांच्या मोठं मोठ्या जागांवर मोठं मोठे रिसॉर्ट कंपन्यांनी बांधून दिले. त्यात किती दिंड्यां मधील पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना उतरायला दिलं जाते? यातून मिळणाऱ्या पैशाचे काय? एवढा पैसा येतो तर सामान्य भक्तांनी त्यात भर न घालता केवळ एक रुपया दक्षणा गुप्तदान म्हणून द्यावे.एक रुपयांचे दान प्रत्येकांनी केले तर मंदिर समितीवर येण्याची अनेकांची धडपड बंद होईल. कुणी समितीवर जायला तयार होणार नाही. तेव्हा आमच्या सारख्या सामान्य प्रामाणिक मास्तरांना समिती वर घ्यायची वेळ येईल. कदाचित तेव्हा परत बडवे उत्पात सेवाधारी यांना पुन्हा संधी आपोआपच प्राप्त होईल.

# कालिदास - संस्कृत भाषेचे महान सर्वश्रेष्ठ कवी आणि नाटककार

**ज्योतिर्मय साहित्य**


मागील अंकावरून पुढे...

शिवपार्वतीचा संयोग आणि वियोग! या महाकाव्यात कवीने लिहिले आहे, ''जगातील सर्व सौंदर्य आई पार्वतीमध्ये आहे!'' अत्यंत संक्षेपात सांगायचे तर ''कुमारसंभवम्'' ही कालिदासांची उत्कृष्ट काव्यात्मक अभिव्यक्ती आहे!

मेघदूतम् (खंडकाव्य): या दूतकाव्याविषयी मी आधीच विस्तृतपणे लिहिले आहे.

ऋतुसंहारम् (खंडकाव्य): ही कालिदासांची सर्वप्रथम रचना आहे, या गेयकाव्यात सहा सर्ग आहेत, ज्यांत षडऋतूंचे (ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर आणि वसंत) वर्णन आहे. या काव्यात कालिदासांचे भारतीय प्राच्यविज्ञान ( ), हवामान,वनस्पतीशास्त्र व वृक्षायुर्वेद अशा विविधांगाने प्रभुत्व दिसून येते. शृंगाररसाने ओतप्रोत असे अलंकारिक भाषेने अलंकृत हे काव्य म्हणजे ऋतूंचे केवळ औपचारिक वर्णन नाही, तर प्रत्येक ऋतूच्या अनुसार शृंगाराचे बदलणारे विविध रंग आणि मानवी भावनांच्या मृदुल आणि तरल संवेदनांनी जिवंत केलेले असे रसपूर्ण आणि बहारदार चित्रणच समजा!

कालिदासांच्या नाट्यरचना आहेत निव्वळ तीन! (संख्या मोजायला एका हाताची बोटे पुरेत!) अभिज्ञानशाकुन्तलम् (नाटक): या नाटकाविषयी काय म्हटले आहे बघा! ''काव्येषु नाटकं




रम्यं तत्र रम्या शकुन्तला'' (कवितेच्या विविध रूपांत जर कुठले नाटक असेल, तर नाटकातील सर्वात अनुपमेय रम्य नाटक म्हणजे अभिज्ञानशाकुन्तलम्!) महाकवी कालिदासांचे हे नाटक सर्वपरिचित आणि सुप्रसिद्ध आहे. हे नाटक महाभारताच्या आदिपर्वात वर्णित शकुंतलेच्या जीवनावर आधारित आहे. संस्कृत साहित्यातील सर्वश्रेष्ठ नाटक म्हणजे अभिज्ञानशाकुन्तलम्!

विक्रमोर्यवशियम् (नाटक): महान कवी कालिदासांचे हे एक रोमांचक, रहस्यमय आणि चित्तथरारक कथानक असलेले ५ अंकी नाटक! शेवटच्या क्षणापर्यंत प्रेक्षकांना गुंतवून आणि गुंगवून ठेवणाऱ्या या नाटकाचे कथानक आधारित आहे एका प्रसिद्ध पौराणिक प्रेमकथेवर. यात कालिदासांनी राजा पुरुरवा आणि अप्सरा उर्वशी यांच्या प्रेमसंबंधाचे काव्यात्मक वर्णन केले आहे. अत्यंत मार्मिक, रोमहर्षक आणि प्रेमाची कोमल अभिव्यक्ती असणारे हे नाटक वाचकांना अतिप्रिय असेच आहे!

मालविकाग्निमित्रम् (नाटक): कवी कालिदासांचे मालविकाग्निमित्रम् हे नाटक त्याच्या




वेगळ्या मांडणीसाठी प्रसिद्ध झाले! शुंगवंशाचा संस्थापक राजा पुष्यमित्र, तर राजा अग्निमित्र हा त्याचा पुत्र! हे नाटक याच अग्निमित्राच्या प्रेमकथेवर आधारित आहे. अग्निमित्र हा राजा, तर त्याचे प्रेम जडते एका सेवकाच्या कन्येशी अर्थात मालविकेवर! दोघांच्या प्रणयाचे सुंदर वर्णन असलेली ही कालिदासांची प्रथम नाट्यकृती! तज्ज्ञ म्हणतात की यात नाटककाराचे काव्यकौशल अंमळ कमीच आहे. मात्र मित्रांनो, ह्या सर्व तुलना कालिदासांच्याच इतर नाटकांबरोबर केलेल्या आहेत, दुसरे कोणीही या स्पर्धेत नाहीच बरं का! आपण फक्त अवाक होऊन माधुर्याने ओतप्रोत अशा या साहित्यरूपी अमृतकलशाचा आस्वाद घ्यायचा!

मंडळी, कालिदासांच्या महान साहित्याचा कॅनवास इतका प्रचंड आहे, की जिथे फक्त त्याचे भाषांतर वाचूनच मी अवाक झाले, तिथे प्रत्यक्ष संस्कृत भाषेच्या अभ्यासकांची काय अवस्था होत असेल!

प्रेरणादायी, प्रस्थापित, प्रचुर रम्य भाषाविलसित, अलंकारमंडित अशी सप्तर्षींप्रमाणे साहित्याच्या नभोमंडळात कायमस्वरूपी ज्योतिर्मय असलेली अत्युच्य दर्जाची तीन नाटके, दोन खंडकाव्ये आणि दोन महाकाव्ये इतकीच काय ती त्यांची अभिजात साहित्यनिर्मिती. पण त्यांचे अध्ययन केल्याशिवाय भारतीय साहित्याचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. अशा या सरस्वतीपुत्राला माझे शतशः नमन!

# पुरुषप्रधान संस्कृती, वर्चस्व आणि काळजी

**ज्योतिर्मय साहित्य**

आपला भारत देश हा ''पुरुषप्रधान संस्कृती'' संपन्न देश आहे. अनादी काळापासून पुरुषांचेच वर्चस्व, मक्तेदारी आपल्याला पाहायला मिळाली. आजतागायत आतापर्यंत आपण अजूनही पाहतो आहोतच. पुरुषप्रधान संस्कृती या संकल्पनेची विस्तृत चर्चा किंवा यावर मोजक्या शब्दात भाष्य करणे हे म्हणजे, जरा काय तर फारच कठीण. पुरुषप्रधान संस्कृती म्हणजे नेमकी कोणती रचना किंवा व्याख्या. आता सरळ सरळ याचा पटेल अथवा समजेल असा अर्थ म्हणजे जिथे पुरुषांना स्त्रियांपेक्षा जास्त वा खूप मोठ्या प्रमाणात अधिकार, प्राधान्य, महत्व, किंमत, उच्च दर्जा दिला जातो. पुरुषप्रधान संस्कृतीचा हा साधा, सोपा आणि सरळ-सरळ गहण अर्थ पटकन सर्वांच्या लक्षात येईल असा आहे.

आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत आजही म्हणजे २१ व्या शतकातही बऱ्याच ठिकाणी आपल्या घरातील स्त्रियांना कमी लेखले जाते, त्यांना निकृष्ठ दर्जा दिला जातो, वेळोवेळी त्यांची अक्कल काढली जाते. ''नकोनको ते काम तुला जमणार नाही. तुला कांही कळत नाही त्यातलं असुदे. एक नंबरची मठ्ठ व बावळट आहेस तु''. ही उर्मट किंवा स्त्रीला तुच्छ लेखणारी भाषा आजही कांही ठिकाणी वा घरांमध्ये बोलली जाते. पण, सर्वात महत्वाचे हे आहे की, यामध्ये सर्वच पुरुष मंडळी मोडतातच असे नाही.

पूर्वीपासून समाजात व सर्वांच्या मनात, विचारात, बुद्धीवर हे बिंबवल्या वा रुजवल्या गेले आहे की, स्त्रिया निकृष्ट आणि पुरुष श्रेष्ठ. आणि हाच समज खूप मोठा गैरसमज म्हणून जन्माला आला. आणि आजही बरेच जण स्वतःला याच बुरसटलेल्या विचारांमध्ये अडकून ठेवले आहेत. ही वस्तुस्थिती आपण नाकारू शकत नाही. आपण म्हणतो पुरुषप्रधान संस्कृती, पुरुषप्रधान संस्कृती आणि त्यातली मक्तेदारी व वर्चस्व. पण यापुढे जाऊन आपण आपल्या सारासार विवेक बुद्धीने कधी विचार करण्याचा प्रयत्न केलाय का?

आपल्या घरातील आपली आई, बहीण, पत्नी, मुलगी यांची काळजी करणारे, यांचे रक्षण करणारे आपले वडील, भाऊ, पती, मुलगा हे ही त्याच पुरुषप्रधान संस्कृतीतील पुरुष आहेत. काळ बदललाय. आणि या बदलत्या काळाचा बदलाचा ओघ ही तेवढ्याच प्रमाणात वेगाने बदललाय. माझी पत्नी नोकरी करावी, माझी मुलगी खूप शिकून स्वतःच्या पायावर उभी राहावी, माझी बहीण खूप शिकून पुढे जावी. बदलत्या काळानुसार



विचार करणारे हे सर्व पुरुष त्याच पुरुषप्रधान संस्कृतीतील पुरुष आहेत. ज्यांनी आपल्या आई, बहीण, पत्नी, मुलगी यांना पुढे जाण्यासाठी भक्कम पाठींबा व एक आधारस्तंभ म्हणून त्यांच्या पाठीशी उभे आहेत.

पत्नी ड्युटी संपवून घरी येताना तिच्या आधी बस स्टॉप वर येऊन थांबणारा नवरा. तिला हजार वेळा फोन करून सांगत असतो ''चांगल्या सीट वर बस, अलर्ट रहा, चौकस नजर ठेव, मी आलोय बस स्टॉप वर निश्चिन्त रहा. सांभाळून ये'' बहिणीला सदैव संरक्षण देणारा भाऊ पावलोपावली तिच्यासाठी हजर राहतो. आपल्या बहिणीकडे वाकड्या नजरेने बघणाऱ्याला हाणून पाडणारे आपले भाऊ. ''ये आई तु पण डान्स क्लास, योगा क्लास जॉईन कर ना गं''. हा गोड सपोर्ट करणारी आजची २१व्या शतकातील मुलं.

हे ही त्याच पुरुषप्रधान संस्कृतीतील पुरुष आहेत ना. आपल्या घरातील या सर्व पुरुष मंडळींनी जर आपल्याला शिक्षण घेण्याचे, नोकरी करण्याचे स्वातंत्र्य दिले नसते तर प्रत्येक स्त्री, मुलीला उंबरठ्याच्या आतमधले जीवन जगावे वा व्यतीत करणे भाग होते. एखाद्या स्त्री अथवा मुलीच्या बाबतीत एखादी घटना घडली की आपण सर्व पुरुष मंडळींना त्याच रांगेत बसवतोत. हे सरळ सरळ चुकीचे आहे. पण, त्याच स्त्री अथवा मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी पुढे असणारे देखील पुरुषच असतात. हे मात्र आपल्या सुंदर नयनांना कधी दिसतच नाही.

मुलींच्या बाबतीत काळ खूप वाईट आहे. सद्य परिस्थितीत मुलींची काळजी हेच प्रथम प्राधान्य म्हणनारे आपले वडील. मुलींची स्कुल टाइम, ट्युशन, क्लास हे सर्व लक्षात ठेऊन तिथे हजर राहणे म्हणजे एका लढाईवर जाण्यासारखे होय. आपल्या मुलीच्या काळजीपोटी सतत जीव मुठीत धरून राहणारे वडील आपल्याला कधी कळलेच नाहीत. वडील थोडं जरी ओरडले, रागावले की आपण क्षणाचा विलंब न करता वडिलांना पुरुषप्रधान संस्कृती च्या रांगेत नेऊन बसवतोत. इथे आपण चुकत नाही का?




''ये आज तिचा बर्थडे आहे. ती पार्टी देणार आहे. लवकर ये हां'' अरे काय यार? तु नाही आलीस काल. काय धमाल केली आम्ही'' हो का. अगं पप्पा नको जाऊ म्हणाले मला. म्हणून मी नाही आले. हे पप्पा पण ना. उगी इथे नको जाऊ तिथे नको जाऊ. करत असतात. काय यार बोरींग लाईफ. ही अशी वाक्य बऱ्याच अंशी ऐकायला मिळतात. वडील ओरडले की आपण म्हणनार, ''हो पुरुषप्रधान संस्कृती आहे ना. मग पितृसत्ताच चालणार. पण त्या ओरडण्यात, त्या रागावण्यात काळजी आणि लेकीच्या काळजीपोटीची आत्मीयता मात्र आपल्याला कधी दिसलीच नाही. वडिलांच्या त्या ओरडण्यात, त्या रागावण्यात आपल्याला फक्त पुरुषप्रधान संस्कृतीच दिसली.

आज याच २१ व्या शतकात ज्या ज्या स्त्रियांनी यशाची उत्तुंग भरारी घेतली आहे, स्त्रिया अंतराळापर्यंत जाऊन पोहोचल्या आहेत, राष्ट्रपती पद भुषवीताहेत. मग आपल्या प्रयत्नरुपी पंखांमध्ये उडण्याचे बळ देण्याचे काम आपल्या वडीलांनी, पतीने केले. म्हणून याचे सर्व श्रेय आपल्या घरातील या पुरुष मंडळींनाच जाते. बायका पोरींची छेड काढणाऱ्या नराधमांपासून त्या स्त्री अथवा मुलींना वाचवणारे हे देखील पुरुषमंडळीच असतात. हे आपण का विसरतोत?. वडिल शिकवत आहेत म्हणून मुली आज बिनधास्त नोकऱ्या करत आहेत. यशाच्या पायऱ्या चढत आहेत. पती सपोर्ट करत आहेत म्हणून आज बायका उच्च पदस्थ आहेत.

आपल्या घरातील स्त्रिया पुढे जाव्यात म्हणून जीव पणाला लावून प्रयत्न करणारे हे ही त्याच पुरुषप्रधान संस्कृतीतील पुरुष आहेत. मग आपण हे का म्हणून विसरावे?. हा प्रश्न आपण स्वतः लाच विचारावा आणि स्वतः च उत्तरही द्यावे. पुरुषप्रधान संस्कृती त्यातील वर्चस्व व मक्तेदारी या सर्व गोष्टी बाजूला सारून, ठेऊन आपण हा विचार करावा की वडील, भाऊ, पती हे सर्वजण आमची काळजी करतात. ही त्यांची मक्तेदारी नाही, ते आमच्यावर वर्चस्व वा अधिकार गाजवत नाहीत. तर ते आमचे रक्षण करतात, काळजी करतात. हे सत्य आपणांस समजले तरच, पुरुषप्रधान संस्कृतीचा हा जो कांही समज अथवा गैरसमज आहे तो क्षणात मिटेल.

वडिलांशिवाय मुलींचे
पती शिवाय पत्नीचे
भावाशिवाय बहिणीचे
मुलाशिवाय आईचे
अस्तित्व शून्य आहे.
हे म्हणने वावगे ठरणार नाही.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559